## भाग -५- गुन्ह्याबाबत -१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ४४८/२०२० कलम ३२४,५०४ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | सुरज गणेशराव तानोडे वय २७ वर्ष रा. नवसारी पुतळयाजवळ अमरावती |
| घटनास्थळ | नवसारी पुतळयाजवळ अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १०/०६/२०२० चे १०.३० वा. |
| दाखल ता. वेळ | दि. १०/०६/२०२० चे १३.२३ वा. |
| आरोपी | निलेश उर्फ बाळु गायकवाड रा. नवसारी अमरावती |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा घरी असतांना त्याचा मोहल्यातील त्याचा मित्र निलेश उर्फ बाळु गायकवाड हा दि. १०/०६/२०२० रोजी सकाळी १०.३० वा. दरम्यान फिर्यादिच्या घरी आला व फिर्यादीस म्हणाला कि तु, बाहेर चल मला दारु पाज ,, फिर्यादीने जाण्यास नकार दिल्यावर गैरअर्जदार यांन् फिर्यादीस अचानक शिवीगाळ करुन विटाचा तुकडा फेकुन मारला त्यामुळे फिर्यादीच्या डावे हाताला व उजवे हाताचे बोटाला मारा लागला अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि. मनिषा सामटकर पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## भाग -५- गुन्ह्याबाबत -२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | ३८७/२०२०, कलम ३२५,३२३,४२७,४४८,५०४,५०६,१०९,३४ भादंवि |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | गरीबनगर भुतेश्वर चौक मडकी अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२२/०५/२०२० चे २३.०० वा. |
| दाखल ता. वेळ. | दि.१०/०६/२०२० चे १४.२० वा. |
| आरोपी | १. एक महीला, २. निरज खडसे, ३.दुर्योधन इंगोले, रा.गरीबनगर भुतेश्वर चौक मडकी अमरावती |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी परीवारासह आपले घरी असतांना आरोपी क्र.१ हिने तु आमचे दारुचे धंदयाविषयी पोलीसांना माहिती का दिली असे म्हणुन शिवीगाळ करुन मारहाण केली तसेच आरोपी क्र.२ याने फिर्यादीचे पती भारत उके यांना लाथा बुक्यांनी जबर मारहाण करुन खांदयाचे हाड मोडले. आरोपी क्र.३ यांनी आरोपी क्र.१ व २ यांना हजर राहुन गुन्हयाकरण्याकरीता प्रोत्साहन दिले व फिर्यादीचे पतीस मारण्याची धमकी दिली. त्यावरुन आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादी व फिर्यादीचे पतीस शिवीगाळ करुन मारहाण करुन घराचे आवारात प्रवेश करुन घरातील टिनपत्रे तसेच धान्य,कपडे,गॅस अशा साहित्याची फेकफाक करुन आर्थिक नुकसान केले अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट व मा.वैद्यकीय अधिकारी यांचे मेडीकल सर्टि. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अंमलदार | सपोनि योगेश व्हि.इंगळे,पो.स्टे. राजापेठ |

## भाग -५- गुन्ह्याबाबत -३

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | २०३/२०२० कलम ३७९ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | अरशदउल्ला सनाउल्ला वय ३९ वर्षे रा. पाकीजा पापुलर सॉं मिल जवळ अमरावती |
| घटनास्थळ | जमील कॉंलनी नाजीया शिक्षक यांचे घरासमोर अमरावती |
| घटना. ता .वेळ | १५/३/२०२० चे १९/०० वा ते २०/०० वा दरम्यान |
| दाखल .ता. वेळ | १०/६/२०२० चे १३/४१ वा |
| आरोपी | अज्ञात |
| हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना तारखे रोजी यातील फिर्यादी याचा मुलगा मो. सुमामा वय १३ वर्षे हा ट्युशन करिता सायंकाळी गेला असता व सायकल पार्कीग मध्ये ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने हीरो कंपनिची सायकल ज्याचा फ्रेम नं. HSC ३२२४७ कि. ५४५० /- रु.ची चोरुन नेली वरुन फिर्यादीच्या जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | ASI गजानन विधाते बनं. ५८५ पोस्टे नागपुरी गेट अमरावती शहर |

## भाग -५- गुन्ह्याबाबत -४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ३९०/२०२० कलम ३५४ भादवी सहकलम ८,१२ पोक्सो |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक मुलगी |
| आरोपी . | प्रशांत उर्फ सोनु गणेशराव पारिसे वय २२ वर्ष रा.रेवसा |
| घटनास्थळ | फिर्यादीचे राहते घरासमोर रोडवर ग्राम रेवसा |
| घटना.ता.वेळ | ०९/०६/२०२० चे २२/३० वा.सुमारास |
| दाखल ता.वेळ | १०/०६/२०२० चे ०१/०८ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपीहे एकाच गावात राहत असुन नमुद घटना ता वेळी व ठिकानी यातील फिर्यादी ही स्वताचे घरासमोरुन रोडवर जात असतांना यातील आरोपी हा रत्यावर उभा होता.त्याने फिर्यादीचा एकदम हात पकडला व म्हणाला ईकडे चल असे म्हणुनफिर्यादीचा विनयभंग केला.त्यामुळे फिर्यादीचे मनात लज्जा निर्माण झाली.तेव्हा फिर्यादीने आरोपीच्या हाताला झटका देवुन स्वताचा हात सोडला त्यानंतर तो आरोपी पळुन गेला. फिर्यादी ही अल्पवयीन असल्याने ती तिचे मामा सोबत पो स्टे ला रिपोर्ट देण्यास आली .आरोपीचे सदरचे कृत्य हे कलम ३५४ भादवी सहकलम ८,१२ पोक्सो चे होत असल्याने फिर्यादीचे जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ गजानन रेवसकर ब.न.७२२ पो स्टे वलगांव |

## भाग -५- गुन्ह्याबाबत -५

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | ५३९/२०२० कलम ३७९ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | धरमेश दिनेशचंद्र शहा वय ४९ वर्ष, धंदा - व्यापार, रा. गर्ल हायस्कुल समोर कॅम्प अमरावती |
| घटनास्थळ | शिवछत्रपती नगर मौजा राजुरा मार्डी रोड अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ९.६.२०२० चे १६.०० वा. पुर्वि |
| दाखल ता. वेळ | दि. १०.०६.२०२० चे ११.०६ वा . |
| आरोपी | अज्ञात |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील यांचे भावाचे ५१,०००/ रु. चौ फुट चा खाली प्लॉट असुन त्या प्लॉट ला पुर्ण बाजुला सिमेंट चे पोल लावुन तारेचे कुंपन केले होते. फिर्यादी हे अचानक आपले भावाचे प्लॉट कडे नेहमी प्रमाणे गेले त्यांना प्लॉटचे उजवे बाजुला असलेली तारेची कुंपन दिसले नाही त्यांनी शोध घेतला परंतु मिळुन आले नाही सदर तार ही कुणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | ए.एस.आय. सुरेंद्र ढोके ब.नं. ६१८ पो.स्टे.फ्रेजरपुरा अम.शहर |

## प्रोव्हीशन (१)

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. ५४०/२०२० कलम ६५(ई) म.दा.का. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे स.पो.उप नि. प्रकाश राठोड ब.नं. ५०० पो.स्टे. फ्रेजरपुरा अम, शहर |
| घटनास्थळ | सिकलकरीपुरा वडाळी अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १०/०६/२०२० चे १२.३० वा. |
| दाखल ता. वेळ | दि. १०/०६/२०२० चे १४.०७ वा. |
| आरोपी | जंजिरसिंग समुंदरसिंग टांक वय २९ वर्ष, रा. सकलकरीपुरा वडाळी अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे कि, फिर्यादी हे पो. स्टेप सह पेट्रोलिंग करित असतांना मिळालेल्या माहीती वरुन प्रो. रेड केला असता यातील नमुद आरोपी हा स्वताचे घरासमोर आपले हातामध्ये पांढऱ्या रंगाचा पोत हातात घेवुन लोकांकडुन पैसे घेवुन अवैद्य दारु विक्री करित असतांना मिळुन आला त्याला जागीच पकडुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव जंजिरसिंग समुंदरसिंग टांक वय २९ वर्ष, रा. सकलकरीपुरा वडाळी अमरावती असे सांगीतले नमुद आरोपी याचे ताब्यातुन पंचना समक्ष ८ नग देशी दारु च्या पावट्या कि. अं. ४००/ रु. चा प्रोव्ही. माल जप्ती पत्रकाप्रमाणे जपत करुन ताब्यात घेतला अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | ए.एस.आय. सुरेंद्र ढोके ब.नं. ६१८ पो.स्टे.फ्रेजरपुरा अम.शहर |